नवराष्ट्र
www.navarashtra.com

बैठक • ऑनलाइन बैठकीत प्रतिनिधींची विविध विषयांवर चर्चा

# सामूहिक वनहक्कधारकांकरिता जाणीव जागृती सप्ताह उत्साहात

**यवतमाळ, ब्युरो.** जिल्ह्यातील सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभामध्ये फाउंडेशन फॉर इकॉलॉजिकल सिक्युरीटी, यवतमाळ आणि पार्टनर संस्था आयोजित 'जागतिक कॉमन्स सप्ताह'चे आयोजन बुधवार (दि. 4) ते शुक्रवार (दि. 6) दरम्यान करण्यात आले. या कॉमन्स सप्ताहमध्ये जगातील वेगवेगळ्या ठिकाणावरून विविध समुदायातील प्रतिनिधी यांची ऑनलाइन बैठक आयोजित केली.

या ऑनलाइन बैठकीत नैसर्गिक साधन संपत्तीचे व्यवस्थापन संवर्धन आणि संगोपन, जैवविविधता, पाणी सुशासन, जमीन आणि साधन संपत्तीचे सुशासन, कॉमन्स जलवायू क्रिया, शहरी कॉमन्स, पशुपालन आणि शेती संबंध, कॉमन्स आणि उपजीविका इतर कल्याणकारी योजना, कॉमन्स आणि लिंग भेदभाव, कॉमन्स आणि संस्कृति, कॉमन्स संघर्ष आणि आव्हान इत्यादी बाबीवर चर्चासत्र, अनुभव कथन करण्यात आले.

संवाद साधणारे नागरिक हे सर्व सामूहिक वनहक्क धारक आहेत. त्यांनी त्यांच्या भाषेत आपले अनुभव कथन केले आहे. ऑनलाइन संमेलन आयोजित करण्यामागचा उद्देश देशातील सामुदायिक व सामूहिक साधन संपत्तीवर काम करणाऱ्या विविध घटकांना एकत्र आणणे आहे, अशी माहिती जिल्हा समन्वयक गोविंद पेडणेकर यांनी माहिती दिली. त्याच प्रमाणे त्यांचे सहकारी विकेश आणि आनंद यांनी कॉमन्स म्हणजे अश्या जागा, संसाधने आणि परंपरा ज्या समुदायाने सामूहिकरित्या समुदायाच्या फायद्याकरिता व्यवस्थापित जतन आणि वापर केल्या आहे. त्यांचे वापर आणि स्वयंचलित व्यवस्थापन करिता एकत्रित



## अधिकार आणि हक्क विषयी जनजागृती

जिल्ह्यातील सर्व गावात मोठ्या प्रमाणात जागतिक कॉमन्स आठवडा 4, 5 ते 6 डिसेंबर दरम्यान साजरा करण्यात आला. या माध्यमातून सामूहिक वनहक्कधारक यांना प्राप्त अधिकार आणि हक्क विषयी जाणीव जागृती होत आहे.

येवून ठरविलेले नियम, शिस्त, सांस्कृतिक मानके विकसित करणे होय, असे त्यांनी सांगितले. याकरिता कार्यरत सर्व फील्ड ट्रेनर आणि मास्टर ट्रेनर यांनी प्रयत्न केले.